# भारत सरकारचे नवीन शैक्षणिक धोरण

अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण या माणसाच्या 21 व्या शतकातील मुलभूत गरजा आहेत. यातील शिक्षण हि अशी गरज आहे कि जी गरज भागवल्यावर माणसाला अन्न, वस्त्र आणि निवारा या गरजांसाठी कोणावर अवलंबून राहावे लागत नाही. फक्त शिक्षण त्या दमाचे असायला हवे. ते म्हणतात न शिक्षण म्हणजे वाघिणीचे दुध जो घेतो तो डरकाळी फोडतोच. शिक्षण हे योग्य दमाचे नाही मिळाले किंवा अद्यावत शिक्षण नाही मिळाले तर त्या शिक्षणाचा फायदा तरी काय? म्हणून शिक्षण प्रक्रियेत सतत योग्य ते बदल घडून येणे आवश्यक असते. शिक्षण हि अखंडपणे बदलत जाणारी एक प्रक्रिया आहे. वरीलप्रमाणे अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या अनेक गरजा कालानुरुप बदलत असतात. या गरजा भागवण्यासाठी सक्षम होणे प्रत्येक नागरीकाला गरजेचे असते. यासाठी शिक्षण-योग्य पातळीवरचे मिळायला हवे.

भारताला स्वातंत्र्य मिळून 73 वर्षे पूर्ण झाली. या जवळपास ७० दशकांच्या काळात आणि भारत स्वतंत्र होण्याच्या आधीच्या काळात अनेक शिक्षण आयोग नेमले गेले. यात 1854 चा वूड्स अहवाल, 1882 चा हंटर अहवाल, 1902 चा रेली आयोग अजूनही बरेच काही यानंतर भारत स्वतंत्र झाल्यानंतर राधाकृष्णन आयोग आणि कोठारी आयोग. यांसारखे आयोग आले. त्यांनी या शिक्षण व्यवस्थेत नेमके कोणते बदल आवश्यक आहेत याबद्दल विवेचन करून सरकार कडे मसुदा तयार करून दिला.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणतून सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, संभाषणकला, सहकार्य, सहवेदना आणि आत्मविश्वास या कौशल्यांवर विशेषत्वाने लक्ष दिले जाणार आहे.

1968 मध्ये देशाचे पहिले शैक्षणिक धोरण इंदिरा गांधी सरकार मध्ये मांडण्यात आले. हे शैक्षणिक धोरण 1964 च्या कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित होते.

१०+२+३ शैक्षणिक प्रणाली स्वीकारण्यात आलेली होती. यासोबत त्रिभाषा सूत्र अवलंबण्यात आलं होतं. यामध्ये प्रथम भाषा मातृभाषा, द्वितीय भाषा राष्ट्रभाषा (हिंदी), तृतीय भाषा म्हणून इंग्रजीचा स्वीकार करण्यात आलेला होता.

सर्वसाधारणपणे याच शिफारशींवर आधारित 1986 मध्ये दुसरे शैक्षणिक धोरण राजीव गांधी सरकारने मांडले. या धोरणामध्ये "विशेषत: भारतीय महिला, अनुसूचित जमाती (अनुसूचित जमाती) आणि अनुसूचित जाती (एससी) समुदायांसाठी असमानता दूर करण्यासाठी आणि शैक्षणिक संधी समान करण्यावर विशेष भर दिला गेला.

या धोरणांमध्ये 1992 च्या नरसिंह राव सरकारने बदल सुचवला आणि काही सुधारणा करण्यात आल्या.

## भारतातील शिक्षण प्रणाली

भारतीय राज्यघटनेच्या राज्य धोरणाची दिशादर्शक तत्त्वे (Directive principal of State Policy - DPSP) च्या भाग 4, कलम 45 आणि 39(एफ) मध्ये, राज्य मान्य आणि सर्वांना न्याय्य व प्रवेश-योग्य शिक्षणाची तरतूद आहे.

१९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्ती कायद्याने शिक्षणास राज्य यादीतून समवर्ती यादीमध्ये स्थानांतरित केले गेले.

2002 मधील 86 व्या घटनादुरुस्तीने मूलभूत अधिकारांच्या कलम 21-ए अंतर्गत शिक्षणाला अंमलबजावणीचा हक्क बनविला.

६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी राईट टू एज्युकेशन (आरटीई), २००९ लागू करण्यात आले आहे.

या अधिनियमात सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना, नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय यासारख्या सरकारी उपक्रमांत समाजातील वंचित घटकांसाठी 25% आरक्षण देण्यात आले आहे.

## नवीन शैक्षणिक धोरणाची पार्श्वभूमी

2015 मध्ये स्मृती इराणी मनुष्यबळ विकास मंत्री होत्या. त्यांनी नव्या शैक्षणिक सुधारणा मान्य करण्याच्या दृष्टिकोनातून ऑक्टोबर 2016 मध्ये धोरण मांडले. यावर जनतेकडून सुधारणा मागवण्यात आल्या. मात्र हे धोरण मंजूर होऊ शकले नाही. या धोरण निर्मितीचे प्रमुख टी. एस. आर. सुब्रमण्यम हे होते.

New National Education Policy 2020 / **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण** २०२० धोरणासाठी पुन्हा दुसरा प्रयत्न माजी इस्त्रो अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी बनवून करण्यात आला.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर नागरिकांच्या निरक्षरतेची समस्या दूर करण्यासाठी, तेव्हापासून भारत सरकारने विविध कार्यक्रम आखले. त्यामध्ये भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी देशभरासाठी 'समान शैक्षणिक पद्धत' आणून, विविध शिक्षण आयोग (डॉ.राधाकृष्णन आयोग) मुदलियार आयोग (माध्यमिक शिक्षण आयोग) आणि कोठारी आयोग हे आयोग प्रस्तावित केले.

भारतीय स्वातंत्र्यानंतर पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८ मध्ये ठरवण्यात आले होते. त्यानंतर दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये लागू करण्यात आले. १९९२ मध्ये या धोरणात काही प्रमणात बदल करण्यात आला. २००९ मध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम RTE Act २००९ संमत केला गेला, या कायद्याने प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षणाचा अधिकार मिळाला. त्यांनतर 'नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' निश्चित करण्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्यात आला.

त्यामध्ये सर्वप्रथम ३१ ऑक्टोबर २०१५ मध्ये टी. एस.आर सुब्रमण्यम ५ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. **एस.आर सुब्रमण्यम** हे माजी कॅबिनेट सचिव होते. यांच्या अध्यक्षतेखाली **'नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण'** निश्चित करण्या संदर्भात समिती गठित करण्यात आली होती. या समितीने २७ मे २०१६ रोजी आपला अहवाल सादर केला.

त्यानंतर **२४ जून २०१७ मध्ये डॉ. के. कस्तुरीरंगन** यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली. **डॉ. कस्तुरीरंगन हे इस्त्रोचे माजी प्रमुख**

**शास्त्रज्ञ** आहेत. '**नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा**' बनवण्याचे काम या समितीकडे होते. 'मानव संसाधन मंत्रालयाला' मे २०१९ मध्ये अहवाल सादर केला.

**३१ मे २०१९ मध्ये रमेश पोखरियाल आयोग** नेमण्यात आला होता. त्यावेळी पोखरियाल हे मानव संसाधन मंत्री होते. हा अहवाल त्यांनी अभ्यासून लोकांची मते मागवली होती. आणि जवळपास दोन लाख लोकांनी या '**नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण**' अहवालावर आपली मते नोंदवली होती.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० उद्देश**

नवीन '**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०**' अन्वये शैक्षणिक ढाच्यामध्ये, नियमांमध्ये, प्रशासकीय व्यवस्थांमध्ये अनेक सुधारणा व आमूलाग्र बदल नमूद करण्यात आले आहेत. या शतकातील **शाश्वत विकास** ध्येये प्राप्त करणे शक्य होईल अशी **समर्थ, सशक्त शैक्षणिक व्यवस्था** उभारणे हे या धोरणाचे उदिष्ट आहे.

**मुख्य उद्देश**

'**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०**' चा मुख्य उद्देश '**भारताला जागतिक स्तरावर ज्ञानाच्या बाबतीत सुपर** power **बनवणे**.' असा आहे.

**<u>नवीन शैक्षणिक धोरणाची महत्वाचे मुद्दे</u>**

- "भारताला जागतिक ज्ञान महासत्ता" बनविणे हे **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण** २०२० चे अंतिम उद्दीष्ट आहे.
- मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय ठेवले गेले.
- 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील शिक्षण प्रणालीतील हा तिसरा मोठा बदल आहे.
- एनईपी 2020 च्या पूर्वी 1968 आणि 1986 मध्ये शैक्षणिक यंत्रणेत सुधारणा झाली.
- शालेय शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लाक्षणिक वाढ करणे नवनवीन उपक्रम राबविणे.
- इसवी सन 2025 पर्यंतपाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व तंत्रज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेणे.
- शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ रचनेवर आधाटरत बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे

**शिक्षक कसा असेल?**

शाखांनी सुसज्ज असलेल्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये स्तरानुसार व विषयवार राबवण्यात येणारा एकीकरण केलेला चार वर्षाचा बॅचलर ऑफ एज्युकेशन हा अभ्यासक्रम शिक्षकांना पूर्ण करणे गरजेचे आहे. शिक्षक होण्याचा हा प्रमुख मार्ग असेल. दुय्यम दर्जाच्या व अकार्यक्षम शिक्षक शिक्षण संस्था बंद करण्यात येतील.

**नॅशनल रिसर्च फाउंडेशन**

नवसंशोधनाच्या कल्पना वेगाने देशभर वितरित व्हाव्यात यासाठी नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना करण्यात येईल.

या धोरणाच्या माध्यमातून सर्वच भारतीय भाषांचे संवर्धन वृद्धी व चैतन्य अबाधीत राहील.

**राष्ट्रीय शिक्षण आयोग National Education Commission**

- ❖ राष्ट्रीय शिक्षण आयोग पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग किंवा नॅशनल एज्युकेशन कमिशन ची स्थापना करण्यात येईल. हा आयोग भारतातील शैक्षणिक दूरदृष्टीचा परिरक्षक असेल.
- ❖ सन 2030 पर्यंत पूर्व-शाळा ते माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण 100% ग्रॉस एनरोलमेंट रेश्यो (जीईआर) सह सार्वत्रिक केले गेले आहे.
- ❖ 10 + 2 ची सद्य शिक्षण प्रणाली नवीन व सुधारित 5 + 3 + 3 + 4 रचनेद्वारे अनुक्रमे 3-8, 8 -11, 11-14, आणि 14 -18 वयोगटातील परस्पर बदलली जाईल.
- ❖ या प्रणालीमध्ये १२ वर्षांचे शिक्षण तीन वर्ष अंगणवाडी / पूर्व-शालेय शिक्षणासह असेल.
- ❖ दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा अधिक सुलभ केल्या जातील आणि तथ्ये शिकण्याऐवजी मुख्य कार्यक्षमतेवर अधिक भर दिला जाईल. सर्व विद्यार्थ्यांना या परीक्षा दोनदा घेण्यास परवानगी दिली जाईल.
- ❖ शाळांमधील शैक्षणिक प्रवाह, अवांतर क्रिया आणि व्यावसायिक प्रवाह यांच्यात कोणतेही कठोर वेगळेपणा असणार नाही.
- ❖ इयत्ता सहावीपासून इंटर्नशिपसह व्यावसायिक शिक्षणाची तरतूद.
- ❖ मातृभाषा / प्रादेशिक भाषा 5 वी पर्यंत शिक्षण देण्यासाठी वापरली जाईल आणि कोणत्याही विद्यार्थ्यावर कोणतीही भाषा कठोरपणे लादली जाणार नाही.
- ❖ शिक्षकांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम (एनसीएफटीई) एनसीईआरटीशी सल्लामसलत करून राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एनसीटीई) द्वारा प्रोग्राम केले जाईल.
- ❖ 4 वर्षे एकात्मिक बी.एड. 2030 पर्यंत पदवी अभ्यासक्रम अध्यापनासाठी किमान पदवी पात्रता असेल.

**उच्च शिक्षण higher education**

अंडरग्रेजुएट कोर्स 3 ते 4 वर्षांच्या लवचिक अभ्यासक्रमासह एकाधिक एक्झिट ऑप्शन्ससह आणि वेगवेगळ्या स्तरावर प्रमाणपत्रांसह दिले जातील. एम.फिल अभ्यासक्रम बंद केले जातील.

वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता संपूर्ण उच्च शिक्षणासाठी **'उच्च शिक्षण आयोग' Higher Education Commission of India' (HECI)** (एचईसीआय) ची स्थापना केली जाईल. सार्वजनिक आणि खासगी दोन्ही उच्च शिक्षण संस्था समान निकषांद्वारे संचालित केल्या जातील.

एचईसीआय मध्ये चार स्वतंत्र विभाग असतील उदा.

१) नियामक चौकटीची देखभाल करण्यासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद (एनएचईआरसी).

२) सर्वसाधारण शैक्षणिक परिषद (जीईसी) मानक सेटिंग्ज देखरेखीसाठी.

३) वित्तपुरवठा करण्यासाठी उच्च शिक्षण अनुदान परिषद (एचईजीसी).

४) अधिकृत मान्यता मिळवण्यासाठी नॅशनल क्रिडिटी कौन्सिल (एनएसी)

१५ वर्षात महाविद्यालयांची संलग्नता प्रणाली पुसून टाकली जाईल आणि महाविद्यालयांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याची यंत्रणा राबविली जाईल. भविष्यात प्रत्येक महाविद्यालयाचा स्वायत्त पदवी देणारा महाविद्यालय किंवा विद्यापीठाचा घटक म्हणून विकसित होणे अपेक्षित आहे.

या नवीन धोरणात शालेय, शिक्षणासाठी एक महत्वाचा आकृतिबंध सुचवलेला आहे. यात 5+3+3+4 अशी इयत्तांची विभागणी आहे. यात पहिल्या टप्प्यात जे 5 वर्ग आहेत यात पहिली तीन वर्षे बालशिक्षण आणि पहिली व दुसरीचे वर्ग ज्या पूर्व प्राथमिक म्हणू. पुढच्या टप्प्यात तिसरी, चौथी आणि पाचवी हे तीन वर्ग प्राथमिक शिक्षणाचे असतील. सहावी, सातवी आणि आठवी हे तीन वर्ग तिसऱ्या टप्प्यात असतील ज्याला आपण पूर्व माध्यमिक म्हणू. शेवटच्या माध्यमिक वर्गांच्या चौथ्या टप्प्यात 4 वर्ग असतील ते नववी ते बारावी.

यापैकी पहिल्या टप्प्यात म्हणजे दुसरीपर्यंत मुलाला वाचन, संभाषण आणि सोप्प अंकगणित एवढ्या बाबी येणे अपेक्षित आहे. पाचवी पर्यंत मुलाला साक्षरता आणि संख्याज्ञान येणे गरजचे आहे. आत्तापर्यंत मुलगा दहावी पास झाल्यावर अकरावी आणि बारावीला कला, वाणिज्य आणि शास्त्र यांसारख्या शाखा निवडत होता. परंतु आता असेल नसेल. नववी ते बारावी पर्यंत सर्व विषयांना समान दर्जा असेल. रसायनशास्त्र, जीवशास्त्र यांसारख्या विषयांसोबत विद्यार्थी संगीत, चित्रकला यांसारखे आवडीचे विषय निवडू शकतो. आज आपल्या देशात व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही 5% आहे. परंतु ही संख्या अमेरिकेत 52%, जर्मनीमध्ये 75% तर कोरियामध्ये 96% आहे. भारत सुद्धा हा आकडा वाढवा अशा प्रकारचा अभ्यासक्रम असावा असे नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुचवण्यात आले आहे.

भारतात यापूर्वी व्यावसायिक शिक्षणला कधीही इतके महत्व देण्यात आले नव्हते. या नव्या शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता सहावीपासून विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेणे बंधनकारक असणार आहे. प्रत्येक विध्यार्थ्याने एकतरी व्यावसायिक कौशल्य शिकावे अशी अपेक्षा नवीन शैक्षणिक धोरणानुसार करण्यात आली आहे. उच्च शिक्षणात प्रवेश हा या व्यावसायिक शिक्षणावर अवलंबून असेल.

जर एखाद्या विध्यार्थ्याने व्यावसायिक शिक्षण घेतले नसेल तर त्याला. पुढे उच्च शिक्षण घेता येणार नाही अशी तरतुद करणात येणार आहे. यार तुमचे व्यावसायिक शिक्षण किंवा अभ्यासक्रम पूर्ण असेल तरच तुम्हाला पुढील उच्च शिक्षण घेता येईल.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 तत्वे / सिद्धांत | Principles of National Education Policy 2020

- प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता शोधणे, ओळखणे आणि त्या विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे.
- शिक्षक आणि पालकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास आणि अभ्यासेतर दोन्ही क्षेत्रांमध्ये चालना देणे.
- प्रत्येक विद्यार्थ्यासाठी **मूलभूत साक्षरता** आणि **संख्याज्ञान** या गोष्टींना इयत्ता ३ री पर्यंत सर्वोच्च प्राधान्य देणे.
- लवचिकता | विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनाचा मार्ग आणि कार्यक्रम निवडण्याची मुभा असेल आणि ते आपली प्रतिभा आणि आवड यानुसार आयुष्यात आपला मार्ग निवडू शकतील.
- **कला** आणि **विज्ञान, अभ्यास** आणि अभ्यासेतर उपक्रम, व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवाह यांच्यामध्ये कोणतेही स्पष्ट विभाजन नसले पाहिजे; म्हणजे ज्ञानाच्या क्षेत्रांमधील हानिकारक उच्च-नीचता आणि त्यांच्यात पडलेले अंतर दूर होईल.

- सगळ्या ज्ञानाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करून एका बहुआयामी जगासाठी **विज्ञान, समाजशास्त्र, कला, मानसशास्त्रे** आणि **खेळ यांच्यामध्ये बहु-शाखीय** (multi-disciplinary) आणि समग्र शिक्षणाचा विकास.
- घोकंपट्टीऐवजी किंवा परीक्षेसाठी शिकण्याऐवजी **संकल्पना** समजून घेण्यावर भर.
- तर्कशुद्ध निर्णय घेण्यासाठी आणि नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन देण्यासाठी **कल्पकता आणि तार्किक विचार.**
- **नैतिकता** आणि मानवी आणि घटनात्मक मूल्ये उदा. **सहृदयता, इतरांबद्दल आदर, स्वच्छता, सौजन्य, लोकशाहीची भावना, सेवेची भावना, सार्वजनिक मालमत्तेबद्दल आदर, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्वातंत्र्य, जबाबदारी, बहुलतावाद,**
- **समता आणि न्याय.**
- अध्यापनात आणि अध्ययनात **बहु-भाषिकत्व** आणि **भाषा शक्ती** यांना प्रोत्साहन.
- **संवाद, सहकार्य, सामूहिक कार्य,** आणि **लवचिकता** अशी जीवन मूल्ये.
- **सातत्यपूर्ण मूल्यांकनावर भर.**
- अध्यापनात आणि अध्ययनात **तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर.**
- **दिव्यांग** विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुलभ बनवण्यासाठी शैक्षणिक नियोजन आणि व्यवस्थापन.
- **शिक्षण हा समवर्ती विषय** आहे हे लक्षात घेऊन सर्व **अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र** आणि धोरण यात विविधतेबद्दल आणि स्थानिक संदर्भांबद्दल आदर.
- शिक्षण व्यवस्थेत सर्व विद्यार्थ्यांना प्रगती करता येईल हे सुनिश्चित करण्यांसाठी
- सर्व शैक्षणिक निर्णयांमध्ये **पूर्ण समानता** आणि **सर्वसमावेशकता**
- प्रारंभिक बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षणापासून ते **शालेय शिक्षण** ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व पातळयांवरील शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुसूत्रता.
- शिक्षक आणि प्राध्यापक हे शिक्षण प्रक्रियेचे केंद्र मानणे - त्यांची भरती आणि तयारीची उत्कृष्ट व्यवस्था, सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास, आणि कामकाजाचे वातावरण व सेवेची स्थिती सकारात्मक असणे.
- शिक्षण प्रणालीची अखंडता, पारदर्शकता आणि संसाधनांची कार्यक्षमता ऑडीट आणि सार्वजनिक प्रकटीकरणाच्या माध्यमातून सुनिश्चित करण्यासाठी **एक 'सुलभ पण परिणामकारक नियमांची चौकट** देणे. त्याबरोबरच स्वायत्तता,
- सुशासन आणि सशक्तीकरणाच्या माध्यमातून नाविन्यपूर्णता आणि चौकटीबाहेरच्या विचारांना प्रोत्साहित करणे.
- **गुणवत्तापूर्ण शिक्षण** आणि विकासासाठी सहआवश्यकता म्हणून उत्कृष्ट दर्जाचे संशोधन.
- शिक्षण तज्ज्ञांद्वारे सातत्यपूर्ण **संशोधन** आणि नियमित मूल्यांकनाद्वारे प्रगतीचा सातत्यपूर्ण आढावा.
- आपल्या भारतीय मुळांचा, भारताचा आणि भारताच्या समृद्ध, वैविध्यपूर्ण, प्राचीन आणि आधुनिक संस्कृती, ज्ञान व्यवस्था आणि परंपरा यांचा अभिमान असणे.
- **शिक्षण** ही एक सार्वजनिक सेवा आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध असणे हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क समजला पाहिजे.
- सशक्त, जिवंत सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेत लक्षणीय गुंतवणूक तसेच देणगीदार खाजगी आणि सामुदायिक
- संस्थांच्या भागीदारीला प्रोत्साहन आणि सुविधा.

**New Education Policy 5+3+3+4 | नविन शैक्षणिक धोरण २०२० संरचना**

शालेय शिक्षणाच्या सध्याच्या १०+२ या शैक्षणिक संरचनेमध्ये आता बदल होऊन, नवीन 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' यामध्ये ३ ते १८ वयोगटाला समाविष्ट करणारी ५+३+३+४ अशी नवीन अध्यापन शास्त्राची अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली आहे.

**शालेय शिक्षणात नविन शैक्षणिक संरचना**

**नवीन 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'** मध्ये शालेय शिक्षणाची रचना आता १०+२ ऐवजी ५ +३ +३ +४ अशी असणार आहे.

**पहिली तीन वर्षे** - पूर्वप्राथमिक, त्यानंतर दोन वर्षे पहिली व दुसरी,

**पुढील तीन वर्षे** - तिसरी ते पाचवी व

**पुढील तीन वर्षे** - सहावी ते आठवी,

**अखेरची ४ वर्षे**- नववी ते बारावी अशा १५ वर्षांमध्ये शालेय शिक्षण विभागण्यात आले आहे.

**New Education Policy 5+3+3+4**

**पहिली ५ वर्षे - (वयोगट)**

**मूलभूत** Fundamental

१. नर्सरी (वयोगट) - ४ वर्षे

२. जूनियर केजी - ५ वर्षे

३. एसआर केजी - ६ वर्षे

४. इयत्ता पहिली - ७ वर्षे

५. इयत्ता दुसरी - ८ वर्षे

**पुढील ३ वर्षे -**

**प्रारंभिक शाळा** Preparatory

६. इयत्ता तिसरी - ९ वर्षे

७. इयत्ता चौथी - १० वर्षे

८. इयत्ता पाचवी - ११ वर्षे

पुढील ३ वर्षे

**माध्यमिक शाळा** Middle

९. इयत्ता सहावी - १२ वर्षे

१०. इयत्ता सातवी - १३ वर्षे

११. इयत्ता आठवी - १४ वर्षे

पुढील ४ वर्ष

**माध्यमिक शाळा** Secondary

१२. इयत्ता नववी - १५ वर्षे

१३. इयत्ता दहावीची - १६ वर्षे

१४. एफ.वाय.जे.सी. - 17 वर्षे

१५. एस.वाय.जे.सी. - १८ वर्षे

अशाप्रकारे नवीन शैक्षणिक संरचना असणार आहे. त्यामध्ये पहिली पाच वर्ष हे **मूलभूत** Fundamental त्यापुढील ३ वर्ष प्रारंभिक शाळा Preparatory आणि पुढील ३ वर्ष माध्यमिक शाळा Middle आणि माध्यमिक शाळा Secondary ४ वर्ष अशी शैक्षणिक संरचना New Education Policy 5+3+3+4 असणार आहे.

**नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मुख्य मुद्दे**

- **बोर्ड परीक्षा** फक्त १२ वीच्या वर्गाला असेल. **महाविद्यालयीन पदवी** ४ वर्षांची असणार आहे.
- दहावी **मंडळ रद्द**. SSC , एमफिल MPhil देखील बंद असेल.
- आता **पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना केवळ मातृभाषा**, स्थानिक भाषा आणि राष्ट्रीय भाषा शिकविली जाईल. उर्वरित विषय जरी तो इंग्रजी असला तरी एक विषय म्हणून शिकविला जाईल.
- बोर्ड परीक्षांचे महत्त्व होणार कमी, आता **बोर्ड परीक्षा फक्त १२वी** मध्ये द्यावी लागेल.
- ९वी ते १२वीच्या सत्र परीक्षा असतील Semester Exam.
- **शालेय शिक्षण** ५ + ३ + ३ + ४ सूत्रांच्या अंतर्गत शिकवले जाईल.
- महाविद्यालयीन पदवी ३ व ४ वर्षांची असेल. म्हणजेच, **पदवीच्या पहिल्या वर्षात प्रमाणपत्र** मिळेल.
- दुसऱ्या वर्षी पदविका असे, तर तृतीय वर्षात डिग्री मिळेल.
- जे संशोधनासाठी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात त्या विद्यार्थ्यांसाठी चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम तर जे विद्यार्थी पदवीनंतर नोकरी करू इच्छितात त्यांच्यासाठी तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असेल.
- विद्यार्थ्यांना यापुढे एमफिल MPhil करावे लागणार नाही. म्हणजेच, रिसर्च करणाऱ्यांसाठी पदवी अधिक एक वर्षांचा मास्टर्स अभ्यासक्रम अशी चार वर्षांची पदवी असेल. यानंतर ते थेट **पीएचडी** PHD करू शकतील. दरम्यान विद्यार्थी इतर कोर्स करू शकतील.
- उच्च शिक्षणामध्ये Higher Education २०३५ पर्यंत एकूण सकल पट नोंदणी Gross Enrolment Ratio **२०३५ पर्यंत** ५०% पोहोचवण्याचं उद्दिष्ट असणार आहे.
- दुसरीकडे नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत जर एखाद्या विद्यार्थ्याला कोर्सच्या मध्यभागी दुसरा कोर्स करायचा असेल तर तो मर्यादित काळासाठी पहिल्या **कोर्समधून ब्रेक** घेऊन दुसरा कोर्स करू शकतो.
- उच्च शिक्षणातही Higher Education अनेक सुधारणा केल्या आहेत. सुधारणांमध्ये श्रेणीबद्ध शैक्षणिक Graded Academic, प्रशासकीय Administrative आणि आर्थिक स्वायत्तता Financial Autonomy समाविष्ट आहे.
- त्याशिवाय **ई-कोर्सेस** प्रादेशिक भाषांमध्येही सुरू केले जातील. आभासी Vertual **लॅब** विकसित केल्या जातील.

- राष्ट्रीय शैक्षणिक वैज्ञानिक मंच (NETF) सुरू होईल. देशात ४५ हजार महाविद्यालये असल्याचे स्पष्ट आहे.
- सर्व सरकारी Government, खासगी Private आणि मान्यताप्राप्त संस्थांसाठी
- Deemed University समान नियम असतील.
- **मल्टीडिसिप्लिनरी अभ्यासक्रम** एकाच वेळी वेगवेगळे विषय एकत्रितपणे शिकता येणार आहेत. यात मेजर आणि मायनर असे विषयांचे विभाजन असेल. आर्थिक किंवा अन्य कारणांमुळे होणारे ड्रॉपआऊट यामुळे कमी होतील. शिवाय ज्यांना एखादा विषय आवडीचा असेल तो विषय त्यांना शिकता येईल...
- **बहुभाषिक शिक्षण** – मुलांना शिकवताना एकाच भाषेच्या माध्यमातून अध्यापन न करता विविध प्रादेशिक भाषांचा वापर करता येणार.
- **लॉ आणि मेडिकल शिक्षण** वगळता उच्च शिक्षण एका छताखाली येणार.
- **शिक्षणातील गुंतवणूक जीडीपीच्या ६% करणार**, सध्या हे **प्रमाण** ४.४३% आहे.
- विद्यार्थ्यांचे **प्रगती पुस्तक** बदलणार. शिक्षकांसोबतच **विद्यार्थीदेखील स्वत:चे मूल्यांकन** करणार.
- सर्व महाविद्यालयांसाठी एकच सामायिक प्रवेश परीक्षा. एनटीए ही परीक्षा घेणार. मात्र ही परीक्षा ऐच्छिक असेल.

**नवे शैक्षणिक धोरण आणि पाच आव्हाने**

गेल्या वर्षीच्या जुलै महिन्यामध्ये भारताने २१व्या शतकातील पहिले व सर्वात व्यापक शैक्षणिक धोरण जाहीर केले. १९८६ नंतर पहिल्यांदाच असे शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणामध्ये भारताच्या शिक्षण व्यवस्थेला भेडसावणाऱ्या विविध आव्हानांवर उपाय सुचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

हे नवे शैक्षणिक धोरण जाहीर झाल्याच्या वर्षापूर्तीनिमित्त बोलताना पंतप्रधान मोदी असे म्हणाले की आपण स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षामध्ये पदार्पण करत आहोत, एका प्रकारे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे हा आता अत्यंत महत्वाचा भाग बनला आहे, नवीन भारत आणि भविष्यासाठी तयार युवा पिढी घडवण्याच्या दृष्टीने हे धोरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

हे २१ शतकातील सर्वात दूरदर्शी धोरण आहे असे मत शिक्षणमंत्री धरमेन्द्र प्रधान यांनी मांडले आहे. याद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतांचा योग्य वापर, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, क्षमता विकास आणि शिक्षणाच्या माध्यमांमध्ये परिवर्तन घडून येणार आहे.

या धोरणामुळे शिक्षण सर्वसमावेशक, किफायतशीर, परवडण्याजोगे आणि न्याय्य होण्यास मदत होईल यावरही प्रधान यांनी भर दिला आहे. आत्तापर्यंत या क्षेत्रात कशी

प्रगती झाली आहे ? हे धोरण खरेच प्रगतीपथावर आहे का ? येत्या काही दशकांमध्ये या धोरणासमोरील आव्हाने कोणती असणार आहेत ? याचा मागोवा या लेखात घेतला जाणार आहे.

**महत्त्वाचे टप्पे**

हे धोरण जाहीर झाल्यापासून गेल्या १६ महिन्यांमध्ये कोरोना महामारीचा सामना करत या धोरणामधील काही महत्त्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणातील ध्येये आणि दृष्टीकोन याबाबत विविध भागधारकांमध्ये जागरूकता आणि हितसंबंध निर्माण करण्याच्या दृष्टीने सरकारने चांगली कामगिरी बजावली आहे.

पंतप्रधान आणि इतर प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती असलेल्या दहा दिवसीय शिक्षक पर्वातून ही बाब प्रकर्षाने दिसून आली. याही पुढे जाऊन सरकारने मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय असे केले आहे. ऊर्जा मंत्रालयात मोठे परिवर्तन घडून आणणाऱ्या धर्मेंद्र प्रधान यांना शिक्षण मंत्रालयात आणल्यामुळे या मंत्रालयाला एक वेगळीच ऊर्जा प्राप्त झाली आहे.

आपल्या कारकीर्दीमध्ये प्रधान यांनी वेळोवेळी उत्तम निर्णय व अंमलबजावणीची क्षमता आणि मुत्सद्दीपणा यांचे दर्शन घडवले आहे. त्यांच्या या कौशल्याचा वापर करून मोठे उपक्रम मार्गस्थ करण्यात फार मोठी मदत होणार आहे. पण विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या राज्यांतून याला विरोध होण्याचीही भीती आहे.

**नव्या शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आर्थिक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. नव्या आर्थिक धोरणामध्ये मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. काही राज्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. तसेच शिक्षण मंत्रालयाने बहुचर्चित अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट हा उपक्रम आणला आहे.**

या उपक्रमाद्वारे उच्च शिक्षणातील अनेक पर्याय विद्यार्थ्यांसाठी खुले होऊ शकतील. याशिवाय इयत्ता ३ री पर्यंत विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन आणि संख्याशास्त्र शिकण्याची क्षमता सुधारण्यासाठी 'निपुण भारत मिशन', पहिलीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी

तीन महिन्यांचा अभ्यासक्रम 'विद्या प्रवेश', शिक्षण अध्ययनासाठीचे 'दीक्षा' हे ॲप आणि माध्यमिक स्तरावरील शिक्षकांसाठी 'निष्ठा' हा शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम असे अनेक उपक्रम सरकारकडून आणण्यात आले आहेत.

या उपक्रमांची अंमलबजावणी सत्ताधारी पक्षांची ज्या राज्यांत सत्ता आहे अशा मूठभर राज्यांतच करण्यात आली आहे. २४ ऑगस्टला नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणारे कर्नाटक हे पहिले राज्य ठरले आहे. अलीकडेच नव्या शैक्षणिक धोरणातील काही उपक्रमांची अंमलबजावणी मध्यप्रदेश आणि हिमाचल प्रदेश या राज्यांनी करून या मेगा पॉलिसीच्या अंमलबजावणीला हातभार लावलेला आहे. आता खऱ्या अर्थाने नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जोर धरला आहे असे म्हणता येईल.

पाच महत्त्वाची आव्हाने

सध्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जरी जोर धरलेला असला तरीही ते पूर्णत्वाला जाण्याच्या मार्गावर अनंत आव्हाने आहेत. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविधता आणि आकार लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी हे एक अवघड काम असणार आहे. उदाहरणासाठी आपण शालेय शिक्षण व्यवस्थेचा विचार करू. १५ लाखाहून अधिक शाळा, २५ करोड विद्यार्थी आणि ८९ लाख शिक्षकांसह भारतातील शिक्षण व्यवस्था ही जगातील दुसऱ्या क्रमांकावरील शिक्षण व्यवस्था आहे.

उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे. एआयएसएचई २०१९ च्या अहवालानुसार, भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जवळपास १००० विद्यापीठे, ३९,९३१ महाविद्यालये आणि १०,७२५ स्वायत्त संस्थांमध्ये मिळून ३.७४ करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावरील सर्व भागधारकांना एकत्र आणून या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे ही एक अत्यंत कठीण बाब ठरणार आहे. विलक्षण विविधता असलेल्या राज्यांमधील तसेच जिल्हास्तरावरील विविध भागधारकांमध्ये सामायिक जबाबदारी व मालकीची भावना निर्माण करणे हे शिक्षण मंत्रालयासाठी मोठे आव्हान असणार आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी देशांच्या, राज्यांच्या आणि सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून आहे. भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निधीची कमतरता आहे, संपूर्ण व्यवस्था ही नोकरशाहीवर आधारलेली आहे व नवीन कल्पना आणि

वाढीच्या क्षमतेस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे असे के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने निदर्शनास आणून दिले आहे.

नव्या शैक्षणिक धोरणामध्ये कल्पना केलेल्या परिवर्तनांच्या विशालतेला चालना देण्यासाठी शिक्षण मंत्रालये (केंद्र आणि राज्ये) आणि इतर नियामक संस्थांमधील अंतर्गत क्षमता अत्यंत अपुरी आहेत. उदाहरणार्थ, पारंपरिक शिक्षणाकडून प्रयोगात्मक शिक्षण व टिकात्मक विचारापर्यंत जाण्यासाठी ही शिक्षण व्यवस्था चालवणाऱ्या लोकांच्या व सोबतच शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या दृष्टिकोनात बदल होणे गरजेचे आहे.

याचा अर्थ असा की या मेगा उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी हजारो शाळा व महाविद्यालयांच्या क्षमता वाढीस व पुनर्निर्देशनास हातभार लावणे आवश्यक आहे. थोडक्यात, मंत्रालयाची विद्यमान संघटनात्मक रचना आणि प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल करावे लागणार आहेत.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या दस्तऐवजामध्ये विद्यमान नियामक व्यवस्थेत सर्वसमावेशक व आमुलाग्र बदल घडवून आणण्याचा मार्ग आखण्यात आला आहे ही एक आशादायक बाब आहे. शिक्षण मंत्रालय सध्या भारत उच्च शिक्षण आयोगाच्या स्थापनेसाठी एक कायदा आणण्याच्या प्रयत्नात आहे. यूजीसी, एआयसीटीई आणि राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषदेच्या जागी भारत उच्च शिक्षण आयोग स्थापन करण्याचा विचारात सरकार आहे.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे धोरण मुख्यत्वे केंद्र आणि राज्यांमधील सहकार्यावर अवलंबून असणार आहे. या धोरणाचा मसुदा केंद्र सरकारने राज्य सरकारांसह विविध भागधारकांच्या योगदानातून तयार केला असला तरी त्याची अंमलबजावणी मुख्यत्वे राज्यांच्या सक्रिय सहकार्यावर अवलंबून आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बहुतांश सेवांवर आधारित शैक्षणिक उपक्रम राज्य सरकारांकडून चालवले जातात.

**अगदी स्पष्टपणे सांगायचं झालं तर विविध उपक्रमांच्या अंमलबजवणीसाठी केंद्राला विकेंद्रीकरण आणि केंद्र- राज्ये यांच्यातील सहकार्य यांचा आधार घ्यावा लागणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये केंद्र व राज्ये यांच्यातील संघर्ष पाहता केंद्राला काळजीपूर्वक पावले उचलावी लागणार आहेत. नव्या शैक्षणिक धोरणातील अनेक तरतुदींवर विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या अनेक राज्यांनी आक्षेप नोंदवलेले आहेत.**

तामिळनाडू राज्याने नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी न करण्याची भूमिका अनुसरली आहे. अशीच भूमिका जर इतर राज्यांनीही घेतली तर केंद्राच्या चिंतेत वाढ होऊ शकते. त्यामुळे केंद्राकडून संघराज्याची समीकरणे कशाप्रकारे हाताळण्यात येत आहेत यावर नव्या शैक्षणिक धोरणाचे भवितव्य ठरणार आहे.

चौथी महत्त्वाची बाब म्हणजे या धोरणाच्या दृष्टीने खाजगी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. भारतातील जवळपास ७० टक्के उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था या खाजगी आहेत. तसेच एकूण संख्येच्या जवळपास ६० ते ७० टक्के विद्यार्थी खाजगी संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेत आहेत. खाजगी क्षेत्र आर्थिक संसाधने व नावीन्यपूर्ण कल्पना प्रदान करतात याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या धोरणाच्या प्रक्रियेसाठी खाजगी क्षेत्राचे योगदान मिळवणे व यातील एक महत्त्वाचा भागीदार म्हणून खाजगी क्षेत्राच्या योगदानाला मान्यता देणे ही एक महत्त्वाची बाब आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विविध उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी येत्या दशकात पुरेल अशा संसाधनांची गरज लागणार आहे. या संदर्भात, या धोरणात म्हटल्याप्रमाणे नव्या धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाला शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्क्यांपर्यंत वाढवावा लागेल. भूतकाळात देण्यात आलेली आश्वासने आणि त्यांची प्रत्यक्ष पूर्तता यांचा विचार केल्यास हे नक्कीच कठीण काम असणार आहे.

उदाहरणार्थ, १९६८च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्क्यांपर्यंत नेण्याची शिफारस करण्यात आली होती. मात्र, गेल्या चार दशकांमध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च ३ टक्क्यांच्या पुढे गेलेला नाही. आश्चर्यकारक बाब म्हणजे ज्या वर्षी हे नवे शैक्षणिक धोरण आले त्यावर्षी शिक्षणावरील खर्च हा सर्वात कमी होता. २०२०-२१मध्ये शिक्षणावरील खर्च ९९,३११ कोटींवरून २०२१-२२ मध्ये ९३,२२४ कोटी इतका कमी झाला.

कोरोना आणि आर्थिक संकटामुळे सरकारने आरोग्य क्षेत्रात अधिक खर्च करणे पसंत केले, त्यामुळे शिक्षण क्षेत्रावरील खर्चात कपात झाली याबाबत कोणतेही दुमत नाही. पण येत्या काळात शिक्षणावरील खर्च कसा वाढवता येईल यासाठी कोणतीही योजना सरकारकडे नाही.

नवे शैक्षणिक धोरण २०२० हा नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे. नव्या युगातील नवी आव्हाने लक्षात घेता विविध शैक्षणिक गरजा, संरचनात्मक असमानता आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यामध्ये येणाऱ्या समस्यांचे निराकरण हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षण व्यवस्थेतील अनेक संकटांना तोंड देण्याचे सर्वात आव्हानात्मक कार्यही या धोरणाद्वारे पूर्ण करायचे आहे.

भारताच्या अफाट लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्याद्वारे असंख्य रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या धोरणाच्या अंमलबजावणीवर ठरणार आहे. कोविड महामारीच्या काळात जलद पावले उचलून अवघड निर्णय घेऊन ते पूर्तीस नेण्याचे कौशल्य केंद्राने दाखवले आहे. याच कौशल्याचा फायदा शिक्षण क्षेत्रातही होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी काही राज्यांनी केली आहे तर काही राज्ये त्या प्रक्रियेतून जात आहेत. तरीही अजून लांबचा पल्ला गाठायचा बाकी आहे.

राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील विविध भागधारकांना तसेच खाजगी क्षेत्राला या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेणे हे एक अवघड काम आहे. सोबतच क्षमता, आर्थिक संसाधने तसेच नवीन कल्पना निर्मितीसाठीच्या अनुकूल वातावरणाची कमतरता ही आव्हानेही समोर आहेत. परंतु या सर्वांमध्ये विविध राज्यांमध्ये जनमत तयार करणे हे सर्वात कठीण काम आहे. थोडक्यात सांगायचे तर नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे यश सहकारी संघराज्य प्रणाली व सुधारणांमध्ये योगदान देण्याची राज्यांची क्षमता यांवर अवलंबून आहे.

**नव्या शिक्षणधोरणातून महासत्तेकडे**

**नवे शैक्षणिक धोरण कागदावर व्यापक, सर्वसमावेशक असले, तरी ते सत्यात उतरवण्यात असंख्य अडचणी आहेत. तरीही त्याची प्रभावी अमलबजावणी भारताला महासत्तेकडे नेईल**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० या ऐतिहासिक धोरणावर २९ जुलै रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील हे तिसरे शैक्षणिक धोरण आहे. यापूर्वी १९६८ आणि १९८६ अशा दोन वेळा तत्कालीन केंद्र सरकारने शैक्षणिक धोरणे घोषित केली होती. त्यानंतर सुमारे ३४ वर्षांनी हे धोरण आले आहे. या धोरणातील अनेक

मुद्दे आणि त्यांच्या अंमलबजावणीविषयी सध्या अनेक व्यासपीठांवर चर्चा सुरु आहे. या धोरणाची प्रभावी अमलबजावणी झाली, तर भारत निश्चितच महासत्तेकडे वाटचाल करेल, असा अनेकांचा सूर आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाच्या आखणीसाठी २०१५ मध्ये गठीत केलेल्या सुब्रमण्यम समितीचा अहवाल, त्याआधारे माजी इस्रो प्रमुख कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वाखालील समितीने २०१९ मध्ये सादर केलेला मसुदा, आणि त्यांनतर या मसुद्यावर देशभरात झालेले विचारमंथन, या सर्वांतून या धोरणाचा जन्म झाला. त्यामागे सुमारे पाच-सहा वर्षांची वैचारिक उहापोह दिसून येते. शिक्षण क्षेत्रातील अनेक तज्ज्ञांचे सल्ले, तसेच भारतभरातील ग्रामपंचायती आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आलेल्या सुमारे २ लाख सूचनांचा समावेश देखील या धोरणात केला गेला आहे. त्यामुळेच या धोरणाला एक सर्वसमावेशक, व्यापक रूप आलेले दिसते.

हे धोरण भारतीय शिक्षण क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरू शकते, अशा प्रकारचे अमुलाग्र बदल यात सुचवलेले आहेत. सर्वप्रथम, शालेय शिक्षणातील आत्तापर्यंतची १०+२ अशी संरचना बदलून इथून पुढे ५+३+३+४ अशी संरचना येणार आहे. मुख्य म्हणजे ३ ते ५ वयोगटातील शिशुंना देखील आता औपचारिक शिक्षणात अंतर्भूत केले जाणार आहे. तसेच शिक्षणाची पहिली ५ वर्षे, जो पुढील वाटचालीचा पाया असेल, ही मातृभाषेतून असावी अशी सूचना करण्यात आली आहे. दुसरे म्हणजे, या धोरणान्वये स्नातक अभ्यासक्रम चार वर्षांचा करून, त्यात वेळोवेळी बाहेर पडण्याचे (एक्झिट) पर्याय उपलब्ध ठेवले आहेत. एम.फील. ही पदवी बंद करण्यात आली आहे. तसेच विविध क्षेत्रांत संशोधनाला उत्तेजन देण्यासाठी नॅशनल रिसर्च फाउंडेशन ची स्थापना करण्यात येणार आहे.

सध्या संपूर्ण विश्व कोविड महामारीने होरपळून निघाले आहे. अश्या परिस्थितीत नवीन शैक्षणिक धोरणाचे विशेष महत्त्व वाटते. सध्या जैविक शास्त्र, लसीच्या शोधाबरोबरच अश्या प्रकारच्या महामारीचे आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक परिणाम, त्यायोगे झालेली अगणित स्थलांतरे, बेरोजगारी, अश्या विषयांवर विचारमंथन सुरु आहे, ज्यातून मल्टी-डिसीप्लीनरी दृष्टिकोनाची भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट होते. तसेच महामारीनंतरच्या काळात शिक्षणाचे आणि ज्ञानाचेही विकेंद्रीकरण झालेले दिसते आहे. ऑनलाईन साधनांच्या जास्तीत जास्त वापरामुळे शाळा, विद्यापीठे सध्या घरोघरी पोहोचली आहेत. तसेच भौतिक अंतराची अडचण गळून पडल्याने समाजातील संवाद, चर्चा वाढली आहे. अश्यावेळी विद्यार्थी ऑनलाईन कोर्सद्वारे नवनवीन विषय, भाषा आत्मसात करताना दिसत आहेत, ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय कोर्सेसही आहेत.

महामारीचे दुष्परिणाम सर्वत्र दिसत असतानाच, जे काही थोडेफार सकारात्मक बदल अनुभवायला मिळत आहेत, त्यापैकी हा एक असे मानायला हरकत नाही. हा बदल नव्या धोरणाला पूरक असाच आहे.

सरतेशेवटी, नवीन शैक्षणिक धोरण हे बदलत्या जागतिक परिस्थितीचे आणि त्यातील भारताच्या बदलत्या भूमिकेचे द्योतक आहे, असे म्हणायला हवे. या धोरणाच्या अमलबजावणीत असलेल्या अडचणी मान्य केल्या तरी त्याचे महत्त्व नाकारता येत नाही. यात अंतर्भूत असलेल्या बदलांमुळे निर्माण होणारी नवीन पिढी भविष्यात या येऊ घातलेल्या 'नवीन भारता'चे समर्थपणे प्रतिनिधित्व करेल, यात शंका नाही.